दै. तरुण भारत

शुक्रवार, २५ मार्च २०२२

# मोती शेती विषयावर विवेकानंदमध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि डी. आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत विवेकानंद कॉलेजमधील प्राणीशास्त्र विभाग यांच्या वतीने पर्ल फार्मिंग (मोती शेती) या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, मोती संवर्धन व प्रशिक्षण केंद्र, सडोली दुमालाचे डॉ. सी. जे. कांबळे, दिलीप कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी दिलीप कांबळे यांनी मोती कसे तयार होतात. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, त्यातून मिळणारा नफा आणि व्यवसाय संधी याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. जी. के. सोनटक्के यांनी करून दिला. सुत्रसंचालन जुवेरिया बाणदार व प्रिया डिसुजा यांनी केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Head,
Department of Zoology

लोकमत

## न्यूज Inbox

### विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तीपत्रिकांचे प्रदर्शन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या प्राणिशास्त्र विभागातर्फे बी.एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांसाठी भित्तीपत्रक प्रदर्शन आयोजित केले होते. त्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी 'मानवी आजार' या विषयावर भित्तीपत्रक तयार करून सादरीकरण केले. त्यात इपीलेप्सी, कावासाकी डिसीज, पार्कीन्स्न डीसीज, डाऊन सिंड्रोम, थायरॉईड, कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर, आदी विषयांवरील भित्तीपत्रकांचा समावेश होता. डॉ. टी. सी. गौपाले यांनी प्रास्ताविक केले. जी. के. सोनटक्के यांनी स्वागत केले. एस. एस. देसाई यांनी आभार मानले.

Hello Kolhapur
Page No. 3 Dec 30, 2021
Powered by: erelego.com

पुढारी

## संक्षिप्त

### विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तीपत्रकांचे प्रदर्शन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** विवेकानंद कॉलेजच्या प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने बी.एस्सी. भाग-३ च्या विद्यार्थ्यांसाठी भित्तीपत्रक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मानवी आजार या विषयावर भित्तीपत्रक तयार करून त्याचे सादरीकरण केले. त्यामध्ये इपिलेप्सी, कावासाकी डिसीज, पार्किन्स्न डीसीज, डाऊन सिंड्रोम, सिकल सेल ॲनेमिया, थॉयराईड, कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर, हायपोक्सिया विषयांवरील भित्तीपत्रकांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आजार होण्यामागील कारणे, लक्षणे, उपचार आणि आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी आणि आहार नियोजन यांची चित्रस्वरूपात मांडणी करून सादरीकरण केले. प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. स्वागत प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. डॉ. एस. एस. देसाई यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Dec 30, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

My Kolhapur Edition
Dec 30, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Head,
Department of Zoology
Vivekanand College,
Kolhapur (Autonomous)